# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## आस्थापना विभाग

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

फोन/फॅक्स नं. ०७१३२-२२३१०४ email:-gondwanaesst@gmail.com

जा.क्र. /गो.वि./आस्था/पुरस्कार-१९/२६८६/२०१९ दि. २३/०७/२०१९

# परिपत्रक

आपणास कळविण्यात आनंद होतो की, वर्ष २०१८-२०१९ करीता गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली परिक्षेत्रातील कला, संस्कृती, साहित्य, शास्त्र, क्रिडा, शिक्षण व संशोधन, सामाजिककार्य, कृषी, उद्योग व व्यापार आदी क्षेत्रांपैकी एखाद्या क्षेत्रामध्ये जीवनभर विशेष उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तीस जीवनसाधना गौरव पुरस्कार, विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक व कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनिय कार्याकरीता विद्यापीठामार्फत पुरस्कार प्रदान केल्या जातात. खालील नमुद पुरस्कार विद्यापीठाच्या वर्धापन दिन कार्यक्रमात देवून त्यांचा गौरव/सन्मान केला जातो. करीता विद्यापीठामार्फत देण्यात येणाऱ्या पुरस्काराबाबत आपल्या अधिपत्याखालील कार्यरत शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांना अवगत करावे.

| अ.क्र. | पुरस्कारांचे नांव | संख्या | पुरस्काराचे सर्वसामान्य नियम |
|---|---|---|---|
| ०१ | जीवनसाधना गौरव पुरस्कार | ०१ | कला, संस्कृती, साहित्य, शास्त्र, क्रिडा , शिक्षण व संशोधन, सामाजीक कार्य, कृषी, उद्योग व व्यापार आदी क्षेत्रांपैकी एखाद्या क्षेत्रामध्ये जीवनभर विशेष उल्लेखनिय योगदान (Outstanding/Extraordinary Contribution) देणारी व्यक्ती, वय ६२ वर्षांपेक्षा कमी नसावे. |
| ०२ | उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार (विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये) | ०१ | किमान १५ वर्ष संलग्नता प्राप्त व महाविद्यालयाच्या विकासाबाबतचे सादरीकरण.(Presentation) |
| ०३ | उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार | ०१ | किमान वीस वर्ष पुर्ण वेळ शिक्षक व पाच वर्ष प्राचार्य असा एकत्रित अनुभव. |
| ०४ | उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार (विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग) | ०१ | १) विद्यापीठाचा मान्यताप्राप्त शिक्षक असावा त्यास १५ वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा.<br>२) PBAS अहवालाचे निर्देशीत API गुण प्राप्त असावे. |
| ०५ | उत्कृष्ट विद्यापीठ अधिकारी पुरस्कार<br>वर्ग - १ करीता<br>वर्ग - २ करीता | ०२ | संबंधित अधिकाऱ्यांची विद्यापीठाच्या आस्थापनेत एकुण सेवा ०३ वर्षांची झालेली असावी, त्याचप्रमाणे संबंधीत अधिकाऱ्यांची उत्कृष्ट अधिकारी पुरस्काराकरीता त्यांच्या प्रतिवेदन अधिकाऱ्यांनी व पुर्नविलोकन अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली असावी. तसेच यापुर्वी सदर पुरस्कार संबंधीत अधिकाऱ्याला प्राप्त झाला असल्यास असे अधिकारी सदर पुरस्कारासाठी पात्र ठरणार नाहीत. सदर पुरस्कार संवैधानिक अधिकारी वगळुन इतर पात्र अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| ०६ | उत्कृष्ट विद्यापीठ कर्मचारी पुरस्कार<br>वर्ग - ३ करीता - ०१<br>वर्ग - ४ करीता -०१ | ०२ | संबंधीत कर्मचाऱ्यांची ०३ वर्षांची नियमीत सेवा झालेली असावी, त्याचप्रमाणे संबंधीत कर्मचाऱ्यांची उत्कृष्ट कर्मचारी पुरस्काराकरीता त्यांच्या प्रतिवेदन अधिकाऱ्यांनी व पुर्नविलोकन अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली असावी. तसेच यापुर्वी सदर पुरस्कार संबंधीत कर्मचाऱ्याला प्राप्त झाला असल्यास असा कर्मचारी सदर पुरस्कारासाठी पात्र ठरणार नाहीत. |
| ०७ | उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार<br>(विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये) | ०१ | कर्मचारी १५ वर्षांपासुन नियमीत आस्थापनेत कार्यरत असावे. |
| ०८ | उत्कृष्ट विद्यार्थी/विद्यार्थीनी पुरस्कार<br>विद्यार्थी - ०१<br>विद्यार्थीनी - ०१ | ०२ | महाविद्यालयात कमीत कमी तीन वर्ष शैक्षणिक, क्रिडा, सांस्कृतिक कार्य, उत्तम चारित्र्य या व्यतिरिक्त देशसेवेकरीता व समाजाकरीता उत्कृष्ट कार्य केलेले असावे. |

दिनांक ०२ ऑक्टोंबर २०१९ रोजी आयोजीत विद्यापीठ वर्धापन दिन समारंभात प्रदान करावयाच्या वरील पुरस्कांरासाठी विद्यापीठ अधिकारी, कर्मचारी , प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांची निवड करण्याचे दृष्टीने सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात मंगळवार, दिनांक २० ऑगस्ट, २०१९ ला सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या कार्यालयात आवेदन पत्रे प्रस्तावासह सादर करण्यात यावे.

(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)
**कुलसचिव**

**सहपत्र** :- आवेदनपत्राचा नमुना

**<u>प्रतिलिपी माहितीस्तव व कार्यवाहीस्तव अग्रेषीत -</u>**

१) मा. कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२) मा. प्र-कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३) मा. विभाग प्रमुख, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४) मा. वित्त व लेखा अधिकारी, वित्त व लेखा विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
५) मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
६) मा. संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
७) विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य
८) विद्यापीठ शैक्षणिक विभागांचे सर्व विभाग प्रमुख
९) विद्यापीठाचे सर्व अधिकारी व विभागप्रमुख

(डॉ. गो. दा. दुबे)
**उपकुलसचिव**

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

एम.आय.डी.सी.रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५
फोन नंबर ०७१३२-२२३१०४


## -: जीवनसाधना गौरव पुरस्कार नियमावली :-

**प्रस्तावना :-**

राज्य व राष्ट्रीय पातळीवर कला, संस्कृती, साहित्य, शास्त्र, क्रीडा, शिक्षण व संशोधन, सामाजिक कार्य, कृषी, उद्योग व व्यापार आदी क्षेत्रांमध्ये जीवनभर सामाजीक बांधिलकी मानुन त्या कार्यासाठी स्वत:ला वाहून घेणाऱ्या व त्या क्षेत्रामध्ये विशेष उल्लेखनीय योगदान(Outstanding/Extraordinary contribution) देण्याऱ्या व्यक्तीस **'जीवनसाधना'** अथवा **'जीवनगौरव'** पुरस्कार देऊन सन्मानीत केले जाते. त्याचप्रमाणे आपल्या विद्यापीठ कार्यक्षेत्रामध्ये वरील पैकी कोणत्याही एका क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीस विद्यापीठ वर्धापन दिनी **'जीवनसाधना गौरव'** पुरस्कार देऊन सन्मान करण्यात यावा असा मा. व्यवस्थापन परिषदेने एकमताने ठराव संमत केलेला आहे. त्या अनुषंगाने **'जीवनसाधना गौरव'** पुरस्कारासाठी मार्गदर्शक नियमावली खालील प्रमाणे तयार करण्यात आली आहे :-

१) कला, संस्कृती, साहीत्य, शास्त्र , क्रिडा, शिक्षण व संशोधन, सामाजिककार्य, कृषी, उद्योग व व्यापार आदी क्षेत्रांपैकी एखाद्या क्षेत्रामध्ये जीवनभर विशेष उल्लेखनीय योगदान (Outstanding/Extraordinary contribution) देणाऱ्या विद्यापीठ कार्यक्षेत्रातील व्यक्तीस जीवनसाधना गौरव पुरस्कार विद्यापीठ वर्धापन दिनी देऊन सन्मानीत करण्यात येईल.

२) पुरस्कारासाठी निवड करण्यात येणाऱ्या/नामनिर्देशित करण्यात येणाऱ्या हयात व्यक्तीचे किमान वय ६२ वर्षापेक्षा कमी नसावे.

२.१) विद्यापीठ कार्यक्षेत्रात जन्मलेली व शिक्षण घेतलेली आणि कर्मभुमी देशातील कोणत्याही राज्यात असलेली व्यक्ती.

२.२) विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेर जन्मलेली व कोठेही शिक्षण घेऊन विद्यापीठ क्षेत्रात कर्मभुमी निवडून दीर्घकाळ सेवेनंतर त्याच क्षेत्रात योगदान देत असलेली व्यक्ती.

३) **पुरस्काराचे स्वरूप**(Nature of Award) :- रोख रक्कम रूपये २५०००/- (रूपये पंचवीस हजार फक्त), सन्मानपत्र व सन्मानचिन्ह असे राहील.

४) **नामनिर्देशन पध्दत** :- सदरील पुरस्कारासाठी मा. व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन केलेल्या व मा. कुलगुरूंनी शिफारस केलेल्या नावांमधुन एका व्यक्तीची या पुरस्कारासाठी निवड करण्यासाठी एका त्रिसदस्यीय समितीचे गठण केले जाईल आणि त्या समितीचे अध्यक्ष अन्य विद्यापीठाचे आजी/माजी मा. कुलगुरू / सेवानिवृत्त न्यायाधिश असतील.

५) **नामनिर्देशन करण्यासाठी मुद्दे :-**

५.१) ज्या व्यक्तीचे नामनिर्देशन सदर पुरस्कारासाठी करावयाचे आहे त्या व्यक्तीची जनमानसात निर्मळ व स्वच्छ प्रतिमा असावी, आणि त्यांचे नैतिक अधिष्ठान इतरांना मार्गदर्शक ठरावे. ती व्यक्ती निर्व्यसनी, निस्वार्थी, निष्कलंकित असावी आणि त्यांच्या विरूध्द अधिकाराचा गैरवापर केल्याची तक्रार नसावी ; तसेच त्यांच्या विरूध्द कसल्याही प्रकारच्या फौजदारी स्वरूपाच्या गुन्हयाची नोंद नसावी.

५.२) त्यांनी ज्या क्षेत्रात कार्य केलेले आहे ते कार्य नाविन्यपुर्ण असावे, ते कार्य समाजउन्नतीचे असावे, त्या क्षेत्रातील मैलाचा दगड(Milestone) ठरणारे असावे.

६) **'जीवनसाधना गौरव'** पुरस्कारासाठी खालील काही क्षेत्रातील कार्याची उदाहरणादाखल माहिती दिली आहे.

६.१) **कृषी क्षेत्र :-** कृषिक्षेत्रातील व्यक्तीचे या पुरस्कारासाठी नामनिर्देशन करावयाचे असेल तर त्या व्यक्तीने नापीक व पडीत जमिनीच्या विकासासाठी, भुजल पातळी व जलसंधारणासाठी विशेष कार्य, नाविन्यपुर्ण पीक पध्दतीचा विकास, ग्रामीण विकासासाठी विज्ञान व कृषी तंत्रज्ञानाचा वापर, जैविक व सेंद्रीय शेती, पशुधन विकास, शेतीपुरक व्यवसाय विकास आदी बाबीपैकी एखादा बाबीवर एक किंवा अधिक गाव पातळीवर सातत्याने कार्य करून इतर भागांसाठी आदर्श निर्माण केलेला असावा.

६.२) **समाजकार्य क्षेत्र : -**

अ) रचनात्मक व समाजबांधणी करणारे कार्य असावे.

ब) प्रबोधन करणारे, अंधश्रध्देचे उच्चाटन करणारे, वैज्ञानिक दृष्टीकोन जागृत करणारे व वाढीस लावणारे असावे.

क) साक्षरता निर्मुलन, शिक्षण, महिला व बालकल्याण या संदर्भात पथदर्शक असावे.

ड) सहकार आणि बचत गट कार्य निकोप पध्दतीने कसे विकसीत करता येईल यासाठी उपक्रम राबविलेले असावेत.

इ) ग्रामीण विकास व समाजोन्नती या बाबींशी निगडीत कृषी, आरोग्य, व्यसनमुक्ती, तंटामुक्ती, स्वंयरोजगार यासारख्या बाबीवर दिशादर्शक/पथदर्शक प्रकल्प राबविलेले असावेत.

६.३) **साहीत्य क्षेत्र :-**

अ) साहित्यातुन मानवी भावभावनांचे, सुख-दुखाचे वास्तव चित्रण असावे.

ब) समाजातील सुष्ट, दुष्ट प्रवृत्तीचे वास्तव शब्दबध्द झालेले असावे.

क) वास्तवाच्या मातीमध्ये मुळे रूजलेली असतानाच मुल्याधिष्टित आदर्शांच्या अवकाशात पंख पसरण्याची ताकद असावी. ज्यामुळे ते साहीत्य समाजाला एक पाऊल पुढे नेण्याचा प्रयत्न करून शकेल.

ड) ज्या सामाजिक परिवेषातुन हे साहित्य अवतरले त्या परिवेषाची सांस्कृतीक, सामाजिक, भाषिक वैशिष्टये त्यामध्ये समर्थपणे चित्रित केलेली असावीत.

इ) वाङ:मयीन मुल्ये जपतानाच शोषण, विषमता, अंधश्रध्दा अशा समाजातील नकारात्मक प्रवृत्ती विरूध्द ठोस विचार मांडलेला असावा.

ई) वाचकाला अस्वस्थ व अंतर्मुख करण्याची ताकद त्यामध्ये असावी.

६.४) **पत्रकारिता क्षेत्र :**

अ) पत्रकारांनी जबाबदारीने वागुन समाजात विश्वासार्हता मिळवलेली असावी व समाज प्रबोधनासाठी सातत्याने लिखाण केलेले असावे.

ब) तो जिज्ञासू व अभ्यासू असावा, आणि समाजातील चांगल्या वाईट घटनांच्या सहृदयाने अभ्यास करणारा असावा.

क) त्याचा जन संपर्क मोठा असावा, व तो नेहमी दक्ष असला पाहिजे.

ड) तो पित पत्रकारीतेपासून अलिप्त असावा.

इ) पत्रकारितेचा अवलंब करून ज्वलंत सामाजिक समस्या निर्भीडपणे मांडणारा असावा.

ई) सामाजिक व्यंग परखडपणे उघड करणारा आणि सर्व सामान्यांच्या जगण्याच्या व मुलभुत घटकाच्या लढाईला वाचा फोडण्याच्या कार्याला आजीवन वाहून घेतलेला असावा.

६.५) **शिक्षण क्षेत्र :-**

सेवानिवृत्तीनंतरही शैक्षणिक चळवळी समाजाविमुख करणारे उल्लेखनीय कार्य करणे, नाविन्यपुर्ण शिक्षण प्रणाली विकसीत करणे, समाजप्रबोधन मुल्याधिष्ठित शिक्षणासाठी सातत्याने प्रयत्नशील असणे, शिक्षण क्षेत्रातील वर्तमान भविष्यातील आव्हाने पेलण्यासारख्या शैक्षणिक संस्थेची उभारणी व सातत्य जपणारे मनुष्यबळ निर्माण करणे.

६.६) **क्रीडा क्षेत्र :-**

अ) क्रीडा क्षेत्रातील एखादया क्रीडा प्रकारात वैयक्तीक उपलब्धीच्या पलीकडे परिसरातील क्रीडा क्षेत्र विकास.

ब) वैयक्तीक पातळीवर लक्ष देऊन नवीन खेळाडू घडवणे.

क) राज्य व राष्ट्रीय पातळीवरील क्रीडा स्पर्धांचे आयोजन,

ड) क्रीडा क्षेत्राचा प्रचार व प्रसारातील विशेष उल्लेखनीय कामगीरी.

इ) क्रीडा कौशल्ये विकास शिबीरांचे आयोजन,

ई) क्रीडा साहित्याची उपलब्धी व निर्मितीसाठी भरीव योगदान.

**७) इतर क्षेत्र : -** **'जीवनसाधना गौरव '** पुरस्काराच्या निवडीसाठी त्रिसदस्यीय समितीने त्या-त्या व्यक्तीच्या क्षेत्रात वर निर्देशित समकक्ष पातळीवर कसोटया लावून पुरस्कारासाठी अंतिम शिफारस करावी.

**८) अंतिम निवड :-** त्रिसदस्यीय समिती नामनिर्देशित नावांपैकी एका व्यक्तीची **'जीवनसाधना गौरव'** पुरस्कारासाठी अंतिम निवड करतील.

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

एम.आय.डी.सी.रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५
फोन नंबर ०७१३२-२२३१०४


## उत्कृष्ट महाविद्यालय, प्राचार्य व शिक्षक पुरस्कार नियमावली :-

विद्यापीठाचे वतीने प्रदान करण्यात येणारे उत्कृष्ट महाविद्यालय, उत्कृष्ट प्राचार्य, व उत्कृष्ट शिक्षक या पुरस्कारांची नियमावली खालील प्रमाणे आहे.

**स्वरूप :-**

१) **उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार :-**
सन्मानपत्र, विद्यापीठ स्मृती चिन्ह व रोख बक्षीस रक्कम रूपये २५,०००/-

२) **उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार :-**
सन्मानपत्र, विद्यापीठ स्मृती चिन्ह व रोख बक्षीस रक्कम रूपये १५,०००/-

३) **उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार :-**
सन्मानपत्र, विद्यापीठ स्मृती चिन्ह व रोख बक्षीस रक्कम रूपये १०,०००/-

उपरोक्त पुरस्कारांचे वितरण हे विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात करण्यात येईल.

**नियमावली :-**

### १) उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार सर्वसामान्य नियम :-

१) किमान पंधरा वर्ष संलग्नताप्राप्त महाविद्यालयानांच पुरस्कारासाठी अर्ज करता येईल.

२) संबधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी पुरस्कारासाठी अर्ज संस्थेच्या अध्यक्ष/सचीव यांच्या मार्फत विद्यापीठास सादर करावा.

३) महाविद्यालयात सुरू असलेले अभ्यासक्रम व विद्यार्थी संख्या शासन व विद्यापीठ प्रमाणात असावी.

४) पुरस्कार प्राप्त महाविद्यालयांना पुढील १५ वर्षांनंतरच पुन:श्च पुरस्कारासाठी अर्ज करता येईल.

५) ५.१) महाविद्यालयात पुढील मुलभूत सुविधा असणे अनिवार्य आहे - स्वत:ची जागा, इमारत, क्रीडांगण, सुसज्य प्रयोगशाळा, समृध्द ग्रंथालय, प्रसाधन गृहे(विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी स्वंतत्र) व इतर सुविधा.

५.२) महाविद्यालयात पुढील सुविधा असल्यास प्राधान्य :- संशोधन केंद्र, उपहारगृह, वसतीगृह(विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी स्वंतत्र), कर्मचारी निवासस्थाने, आरोग्य सुविधा, इंटरनेट, बॅकींग सेवा, दुरध्वनी व वाहतुक सुविधा इत्यादी.

६) महाविद्यालयाची सांस्कृतिक, क्रिडा विषयक व इतर क्षेत्रातील प्रगती.

७) महाविद्यालयाचे नॅक कडून झालेले मुल्याकंन/पुनर्मुल्यांकन.

८) महाविद्यालयास मिळालेले अनुदान(अनुदानित महाविद्यालयासाठी शासन, विद्यापीठ अनुदान आयोग व इतर मान्यताप्राप्त संस्थाकडून).

९) महाविद्यालयाने राखीव निधीसाठी केलेले प्रयोजन.

१०) महाविद्यालयाचे शैक्षणिक विकासात, सामाजिक व राष्ट्रीय उपक्रमातील योगदान.

११) महाविद्यालयाची शैक्षणिक प्रगती- निकालाची टक्केवारी, गुणवत्ता यादीतील विद्यार्थी, शिक्षकांना मिळालेले पुरस्कार, प्रकल्प, पेटेंट इत्यादी.

१२) आतंरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य व विद्यापीठस्तरावर महाविद्यालयाने यशस्वीरीत्या आयोजीत केलेले उपक्रम.

१३) महाविद्यालयाकडे विद्यापीठाचे कोणतेही देयक थकीत नसावे.

१४) महाविद्यालयास विद्यापीठाकडून कोणताही दंड झालेला नसावा.

१५) महाविद्यालयाचे परिक्षाकेंद्र विद्यापीठाकडून रद्द झालेले नसावे.

१६) उपरोक्त मार्गदर्शक तत्वानुसार छाननी समिती महाविद्यालयाची पुरस्कारासाठी शिफारस करेल.

१७) अंतिम निर्णय निवड समिती निर्देशित निकषांच्या आधारे / प्रत्यक्ष मुलाखत घेवून करेल.

१८) विद्यापीठाकडून प्रदान करण्यात आलेला पुरस्कार हा अपवादात्मक परिस्थीतीत परत घेण्याचा सर्वस्वी अधिकार हा विद्यापीठास राहील.

## २) उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार सर्वसामान्य नियम :-

१) गुणवत्ता सुधार योजनांतर्गत संलग्न महाविद्यालयातील प्राचार्यांचा, प्रत्येक वर्षी गुणगौरव केला जाईल.

२) किमान वीस वर्ष पुर्ण् वेळ शिक्षक म्हणुन संलग कार्यरत व यापैकी किमान पाच वर्ष प्राचार्य म्हणुन कार्यरत असलेल्या व्यक्तींना अर्ज करता येईल.

३) संपुर्ण सेवा कालावधीत विद्यापीठामार्फत एका प्राचार्याचा एकदाच गुणगौरव केला जाईल.

४) संबधीत प्राचार्यांची प्रशासन क्षमता, केलेले संशोधन, विस्तार कार्य, संशोधन प्रकल्प, पुस्तक निर्मिती या बाबी विचारात घेतल्या जातील.

५) पुरस्कारासाठी किमान पाच प्रस्ताव येणे अपेक्षीत आहे. तथापी छाननी समितीला स्वत: होउून योग्य प्रस्ताव मागवून घेण्याचे अधिकार असतील.

६) प्राचार्यांच्या सामाजिक, राष्ट्रीय व इतर कार्यातील कृतियुक्त सहभागाचा विचार केला जाईल.

७) विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णयप्रक्रियेत विविध प्राधिकरणाच्या माध्यमातुन सहभाग.

८) अध्यापन व संशोधनामध्ये उल्लेखनिय कामगीरी.

९) आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य व विद्यापीठ स्तरावरील चर्चासत्रे, कार्यशाळा व परिषदांमध्ये सहभाग व यशस्वी आयोजन.

१०) राज्यस्तरीय व विद्यापीठ स्तरीय युवक महोत्सव तसेच क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे यशस्वी आयोजन.

११) शिक्षक व शिक्षकेत्तर सहकाऱ्यांच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी राबविलेले उपक्रम.

१२) महाविद्यालयात राबविण्यात आलेले अभ्यास, अभ्यासपुरक व अभ्यासेत्तर उपक्रम(राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, नियतकालिके व विस्तार सेवा संदर्भात)

१३) यशस्वी प्रशासक म्हणुन असलेली प्रतिमा(विविध पुरावे जोडावेत.)

१४) अर्जदारास एकुण सेवा काळात वैयक्तीक किंवा सार्वजनिक कामासाठी फौजदारी गुन्हयात तसेच परिक्षेच्या संदर्भात कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

१५) छाननी समिती उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने उपलब्ध माहितीच्या आधारे छाननी करून योग्य उमेदवारांची शिफारस करेल.

१६) अंतिम निर्णय निवड समिती निर्देशित निकषांच्या आधारे / प्रत्यक्ष मुलाखत घेवून करेल.

१७) पुरस्कारांच्या कालावधीत मा. व्यवस्थापन परिषदेवर सदस्य असलेले प्राचार्य सदरील पुरस्कारासाठी पात्र ठरणार नाहीत.

१८) विद्यापीठाकडून प्रदान करण्यात आलेला पुरस्कार हा अपवादात्मक परिस्थितीत परत घेण्याचा सर्वस्वी अधिकार हा विद्यापीठास राहील.

## ३) उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार सर्वसामान्य नियम :-

१) गुणवत्ता सुधार योजनांतर्गत विद्यापीठ विभाग व संलग्नीत महाविद्यालयातील व विद्यापीठ पदव्युत्तर विभागातील प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/सहाय्यक प्राध्यापक या मधुन एका शिक्षकाचा प्रत्येक वर्षी गुणगौरव केला जाईल.

२) किमान पंधरा वर्ष पुर्ण वेळ शिक्षक म्हणुन सलग कार्यरत शिक्षकांचा विचार करण्यात येईल(या पैकी किमान दहा वर्ष सलग सेवा या विद्यापीठ कक्षेतील असावी.)

३) संपुर्ण सेवा कालावधीत विद्यापीठामार्फत एका शिक्षकाचा एकदाच गुणगौरव केला जाईल.

४) संबधीत शिक्षकाने केलेले संशोधन, विस्तार कार्य, संशोधन प्रकल्प, पुस्तक निर्मिती व पेटेंट या बाबी विचारात घेतल्या जातील.

५) अभ्यासेत्तर (Extra-Curricular), अभ्यासपुरक (Co-Curricular) आणि प्रशासकीय कार्यक्रमातील (Administrative) सहभाग विचारात घेतला जाईल.

६) शिक्षकांचा सामाजिक, राष्ट्रीय व इतर विधायक कार्यक्रमात कृतियुक्त सहभाग तसेच विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णय प्रक्रियेत विविध प्राधिकरणाच्या माध्यमातुन सहभाग विचारात घेतला जाईल.

७) अध्यापन/प्रात्यक्षिक कार्यासाठी स्वत: विकसीत केलेली पध्दत.

८) पुरस्कारासाठी विविध विद्यापीठ विभाग व महाविद्यालयामधील किमान पाच प्रस्ताव येणे अपेक्षीत आहे. तथापी छाननी समितीला स्वत: होडून योग्य प्रस्ताव मागवून घेण्याचे अधिकार असतील.

९) सेवाकाळात शिक्षकास वैयक्तीक किंवा सार्वजनिक कामासाठी फौजदारी किंवा अन्य स्वरूपाच्या गुन्हयात तसेच परिक्षेच्या संदर्भात कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

१०) पुरस्काराच्या कालावधीत मा. व्यवस्थापन परिषदेवर सदस्य असलेले सहा. प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/प्राध्यापक सदरील पुरस्कारासाठी पात्र ठरणार नाहीत.

११) छाननी समिती उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने उपलब्ध माहितीच्या आधारे छाननी करून योग्य उमेदवारांची शिफारस करेल.

१२) अंतिम निर्णय निवड समिती निर्देशित निकषांच्या आधारे / प्रत्यक्ष मुलाखत घेवून करेल.

१३) विद्यापीठाकडून प्रदान करण्यात आलेला पुरस्कार हा अपवादात्मक परिस्थीतीत परत घेण्याचा सर्वस्वी अधिकार हा विद्यापीठास राहील.

**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

एम.आय.डी.सी.रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५

फोन नंबर ०७१३२-२२३१०४

**उत्कृष्ट विद्यापीठ अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी/विद्यार्थीनी पुरस्कार नियमावली :-**

विद्यापीठाचे वतीने प्रदान करण्यात येणारे उत्कृष्ट विद्यापीठ अधिकारी/कर्मचारी, उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार(विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये), व उत्कृष्ट विद्यार्थी/विद्यार्थीनी पुरस्कार या पुरस्कारांची नियमावली खालील प्रमाणे आहे.

**स्वरूप :-**

१) **उत्कृष्ट विद्यापीठ अधिकारी पुरस्कार (वर्ग १ व २) :-**
प्रत्येकी एक पुरस्कार, सन्मानपत्र, विद्यापीठ स्मृती चिन्ह व रोख बक्षीस रक्कम प्रत्येकी रूपये ५,०००/- (शाल व श्रीफळ)

२) **उत्कृष्ट विद्यापीठ कर्मचारी पुरस्कार (वर्ग ३ व ४) :-**
प्रत्येकी एक पुरस्कार, सन्मानपत्र, विद्यापीठ स्मृती चिन्ह व रोख बक्षीस रक्कम प्रत्येकी रूपये २,५००/- (शाल व श्रीफळ)

३) **उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार (विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये ) :-**
एक पुरस्कार, सन्मानपत्र, विद्यापीठ स्मृती चिन्ह व रोख बक्षीस रक्कम रूपये ५,०००/- (शाल व श्रीफळ)

४) **उत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार :-**
विद्यापीठ संकुले व सर्व संलग्नीत महाविद्यालये एक पुरस्कार, सन्मानपत्र, विद्यापीठ स्मृती चिन्ह व रोख बक्षीस रक्कम रूपये ३,०००/- (शाल व श्रीफळ)

५) **उत्कृष्ट विद्यार्थीनी पुरस्कार :-**
विद्यापीठ संकुले व सर्व संलग्नीत महाविद्यालये एक पुरस्कार, सन्मानपत्र, विद्यापीठ स्मृती चिन्ह व रोख बक्षीस रक्कम रूपये ३,०००/- (शाल व श्रीफळ)

उपरोक्त पुरस्कारांचे वितरण हे विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात करण्यात येईल.

**नियमावली :-**

**उत्कृष्ट विद्यापीठ अधिकारी/कर्मचारी पुरस्कार सर्वसामान्य नियम :-**

१) संबंधीत अधिकारी/कर्मचारी याची सेवा विद्यापीठाच्या आस्थापनेत एकुण सेवा ०३ वर्षांची झालेली असावी, त्याचप्रमाणे संबंधीत अधिकाऱ्यांची उत्कृष्ट अधिकारी/कर्मचारी पुरस्काराकरीता त्यांच्या प्रतिवेदन अधिकाऱ्यांनी व पुर्नविलोकन अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली असावी. तसेच यापुर्वी सदर पुरस्कार संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांना प्राप्त झाला असल्यास असे अधिकारी/कर्मचारी सदर पुरस्कारासाठी पात्र ठरणार नाहीत. सदर पुरस्कार संवैधानिक अधिकारी वगळुन इतर पात्र अधिकारी/कर्मचारी यांना प्रदान करण्यात येईल.

**उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार सर्वसामान्य नियम(विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये) :-**

१) सदर कर्मचारी १५ वर्षापासुन महाविद्यालयात नियमीत आस्थापनेत कार्यरत असावा.

**उत्कृष्ट विद्यार्थी / विद्यार्थीनी पुरस्कार :-**

१) महाविद्यालयात कमीत कमी तीन वर्ष शैक्षणिक, क्रिडा, सांस्कृतिक कार्य, उत्तम चारित्र्य या व्यतिरिक्त देशसेवेकरीता व समाजाकरीता उत्कृष्ट कार्य केलेले असावे.

# -: विद्यापीठ पुरस्कार निवड प्रक्रिया :-

**अ)** सर्व पुरस्कारासाठी विद्यापीठाने तयार केलेला विहीत प्रपत्रात अर्ज मागवण्यात येतील. दरवर्षी आलेल्या अर्जाची छाननी करण्यासाठी विद्यापीठाचे मा. कुलगुरू यांचे मार्फत पाच सदस्यीय समितीचे गठन करण्यात येईल सदर समितीचे गठण खालीलप्रमाणे असेल.

१. व्यवस्थापन परिषद सदस्य जे प्राचार्य आहेत - ०१

२. व्यवस्थापन परिषद सदस्य चक्रीय पध्दतीने - ०१

३. विद्वत परिषद सदस्य - ०१

४. मा. कुलगुरू नामनिर्देशीत विद्यापीठाच्या पी.जी.टी.डी. विभागातील एक प्रतिनिधी -०१

५. कुलसचिव

उपरोक्त प्रमाणे गठित समिती प्रत्येक पुरस्कारासाठी तीन नावांची शिफारस करील. छाननी समितीने शिफारस केलेल्या नावामधुन अंतिम निवड करण्यासाठी एक त्रिसदस्यीय निवड समिती मा. कुलगुरू गठीत करतील त्या समितीचे अध्यक्ष हे इतर विद्यापीठाचे आजी/माजी मा. कुलगुरू किंवा न्यायाधिश असतील व इतर दोन सदस्यापैकी एक सदस्य हे प्रस्तृत विद्यापीठ किंवा महाविद्यालयाशी संबधीत असतील.

**ब)** दरवर्षी २० ऑगस्ट पर्यंत इच्छुक व्यक्ती/ महाविद्यालये स्वत:चा प्रस्ताव महाविद्यालयामार्फत विहीत प्रपत्रात आवश्यक त्या कागदपत्रासह कुलसचिव यांचेकडे सादर करतील.

**क)** २० ऑगस्ट ते १५ सप्टेंबर या काळात छाननी समिती प्राप्त प्रस्तावाची छाननी करून यादी कुलसचिव यांचे कडे सादर करील.

**ड)** १५ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर पर्यंत कुलसचिव हे निवड समितीची बैठक आयोजीत करून छाननी समितीने सादर केलेल्या यादी मधील संबधीताना निवड समिती समोर प्रस्तृत करतील. निवड समिती संभाव्य पुरस्कार प्राप्त महाविद्यालय/शिक्षक/अधिकारी यांची यादी अंतीम करतील व संबधीताना ३० सप्टेंबर पुर्वी कळवतील. निवड समितीमार्फत अंतिम निवड यादी प्रमाणे विद्यापीठ वर्धापन दिनी ०२ आक्टोंबर अथवा मा. कुलगुरू परिस्थितीच्या अनुषंगाने ठरवतील अशा समारंभात पुरस्कारांचे वितरण होईल.

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## -: जीवनसाधना गौरव पुरस्कार :-

१) नांव :-

२) लिंग (स्त्री/पुरूष) :-

३) जन्म दिनांक :-

४) वय :-

५) जन्म स्थळ :-

६) राष्ट्रीयत्व :-

७) धर्म :-

८) संवर्ग (अ.जा./अ.ज./इ.मा./खुला) :-

९) शैक्षणिक अर्हता :-

१०) व्यवसाय (हुद्दा) :-

११) व्यावसायीक अनुभव :-

१२) वाहून घेतलेले आवडीचे क्षेत्र :-

१३) कोणत्या गावात/विभागात/जिल्हयात कार्य केले :-

१४) प्राप्त सन्मान, पुरस्कार :-

१५)) विशेष कामगिरी :- आवडीच्या क्षेत्रामध्ये सातत्याने कार्यरत राहून समाजोन्नतीसाठी केलेली विशेष कामगिरी(जवळपास दोन पेजेस मध्ये पेपर कात्रणे किंवा प्रमाणपत्रासह वेगळे परिशिष्ट जोडून माहिती द्यावी.)

नाम निर्देशन करणाऱ्या
व्यक्तीने नाव व सही

Gondwana University,
Gadchiroli

# Proforma - Application For
# Best College Award

1. A) Name of the College :------------------------------------------
   Address :------------------------------------------
   E-mail :--------------------Web :- --------------------
   Phone No. :--------------------Fax No. :- --------------------
   Name of the Principal :------------------------------------------
   E-mail & Phone No. :- ------------------------------------------
   B) Year of establishment of the College :- ------------------------------------------
   C) Whether recognized by UGC under 2f & 12B(Give Details), :------------------------------------------
   D) Whether the college belongs to Rural / Urban Area :------------------------------------------
   E) Name of the Society which runs the College :------------------------------------------
   F) Members of LMC / Standing Committee :------------------------------------------
2. Status of the college - Affiliated / Autonomous :------------------------------------------
3. Streams / Faculties :------------------------------------------
4. Whether Accredited by NAAC ? If yes, Grade--------------------Year --------------------
5. Whether Re-Accredited by NAAC ? If yes, Grade--------------------Year --------------------
6. Academic results of final Year examination of the last three years.

| Academic Year | Class | No. of Students appeared | 1st Class | 2nd Class | Pass Class | Any Special Merit |
|---|---|---|---|---|---|---|
| 2015-2016 | | | | | | |
| 2016-2017 | | | | | | |
| 2017-2018 | | | | | | |

7. Number of add-on courses (Certificate, Diploma, advanced level Diploma) Self financing Courses introduced by the College.
8. Special merit shown in Sports / Athletics events at Inter Collegiate level and above(Inter Collegiate, Ashwamedh, Inter University, National / Inter National Level) by the students of the college in the last three years(Give Details)
9. Special merit shown in Cultural events at inter Collegiate Level and above (Inter Collegiate, Indradhanush, Ashwamedh, Avishkar, Inter University, Zonal National Level) by the students of the college in the last three years(Give Details)

   (As per 11 - 12 stafling pattern)

10. Total No. of Sanctioned Post of Teaching Staff :------------------------------------------
    Total No. of Confirmed Teacher :------------------------------------------
    Total No. of Teacher son Probation :------------------------------------------
    No. of Confirmed / on Probation teachers with Ph. D. :------------------------------------------
    No. of Confirmed / on Probation teachers with NET / SET :------------------------------------------
    No. of Confirmed / on Probation teachers with M. Phil :------------------------------------------
    No. of Teaching post filled with Ad-hoc appointment :------------------------------------------
    No. of Teaching post Vacant :------------------------------------------
11. No. of sanctioned posts of Non-Teaching Staff :------------------------------------------
    No. of posts filled :------------------------------------------

12. No. of University / UGC / Any other Agency sponsored research projects completed in last three year(Give Details)

13. A) No. of Class rooms :-----------------------------------------------------------------------

B) No. of Laboratories Subject wise :-----------------------------------------------------------------------

C) No. of Computers in the College :-----------------------------------------------------------------------

D) Is any department recognized as Research Center of the University : -----------------------------------------

If yes(Give Details)

E) List Major Equipments available in College :- -----------------------------------------------------------------

14. No. of Research Projects submitted to UGC/CSIR/DST or other funding agencies, for approval during the period of last three years.

15. A) No. of Research Projects approved by UGC/CSIR/DST or other funding agencies, with details.

B) No. of recognized Ph. D. Guides in the College (Give Names, Subjects & Period of Recognized)

16. List of students working/awarded for M. Phil & Ph. D. (Details be given for the last o5 years)

| Name of the Students | Subjects | Topic of Research | Name of the Guide | Date of Registration | Date of Award |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

17. Information about Collaborations signed by the College :-

**a) With Industry :-**

| Name of the Industry | Purpose | Duration/period |
|---|---|---|
| | | |
| | | |

**b) With University / Colleges :-**

| Name of the University/Colleges | Purpose | Duration/period |
|---|---|---|
| | | |
| | | |

**c) With Research Institute :-**

| Name of the University/Colleges | Purpose | Duration/period |
|---|---|---|
| | | |
| | | |

18. Whether the College is preparing proposal for Autonomy.

19. Whether IQAC established in your college, if yes give details.

20. Seminar / Workshop / Conference organized by the College during the last three years.

21. Seminar / Workshop / Conference attended by the Teachers of the College during the last three years.

22. Refresher / Orientation course attended by the Teacher of the College during the last three years.

23. Whether organized Major sports events as academic event ?

24. Whether the College has a separate Cell for redressing Women's atrocities ?

25. Any other healthy practice adopted by the College in Administration, Teaching or other Academic areas.

26. Any other relevant information about the College.

Place :-

Date :-

Signature of the Principal

Note :- Please enclose additional sheet regarding essential information if any as per the guidelines, in additional to this proforma.

# UNDERTAKING

I----------------------------------------------------------------- in the capacity of Principal of ------------------------ ----------------------, hereby do state that,

1. There is no bill / amount / Fees / Fine of any kind payable to the University is pending with the College.
2. The College is not punished / Fined by the university for any Reason or matter.
3. The College Exam centre is not rejected / cancelled by the University.
4. The College has not harassed any Teacher / Non Teaching Member / Students for any reason.

Signature with seal of Principal
College Name & Address :-

Endorsement of the Chairman / Secretary of the College management.

Signature with seal of Chairman / Secretary

Gondwana University,
Gadchiroli

**Proforma - Application For**

# Best Principal Award

FOR THE YEAR 2018 -2019

